# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## सार्वजनिक आरोग्य विभाग

### मानधन तत्त्वावरील स्टाफ नर्स, अे.एन.एम., मिश्रक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ इ. जागांसाठी भरती प्रक्रिया

## जाहिरात

नाशिक महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य विभाग अंतर्गत खालील पदे मानधन पदधतीने 6 महिने कालावधीकरिता भरती करणेकामी अर्हता धारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सर्व संबधित उमेदवारांनी किमान शैक्षणिक अर्हता धारण करत असल्यास आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्रासह जाहिरात प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन विहित नमुन्यातील अर्ज संकेतस्थळावरुन डाउनलोड करुन नमुद सर्व साक्षांकित कागदपत्रासह अर्ज सादर करावा. अर्ज कार्यालयीन सुट्टी व सार्वजनिक सुटटी वगळुन सकाळी 10:00 ते 05:00 वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख दि. 29/08/2019 रोजी सांयकाळी 05:00 वाजेपर्यंत असेल. यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. परंतु अर्ज स्विकारणेच्या अंतिम वेळेबाबत स्थानिक परिस्थितीप्रमाणे बदल करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांचा असेल. जाहिरात मुदतीत प्राप्त अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारांची यादी मुलाखतीसाठी सार्वजनिक आरोग्य विभाग मुख्यालय तसेच मनपाच्या www.nashikcorporation.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**अर्ज स्विकारण्याचे ठिकाण व वेळ** :- सार्वजनिक आरोग्य विभाग, 3 रा मजला, मनपा मुख्यालय, राजीव गांधी भवन, शरणपूररोड, नाशिक. वेळ :- सकाळी 10:00 ते 05:00 अंतिम तारीख दि.29/08/2019.

अर्जाची छाननी झाल्यानंतर मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी www.nashikcorporation.in या संकेत स्थळावर तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग मुख्यालय येथे लावण्यात येईल. तदनंतर पात्र उमदेवारांच्या मुलाखती घेण्यात येतील.

**मुलाखतीचे ठिकाण / दिनांक / वेळ :-**

अर्ज स्विकृती व अर्जाची छाणणी पुर्ण झाल्यानंतर मुलाखतीकरीता निवड उमेदवारांची यादी मुलाखतीची दिनांक व वेळ ही मनपाच्या संकेतस्थळावर व सार्वजनिक आरोग्य विभाग मुख्यालय येथे प्रसिध्द करण्यात येईल. तसेच मुलाखतीसाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना निवडी संबंधित हरकत घ्यावयाची असल्यास यादी प्रसिध्द झाल्यापासुन 24 तासाच्या आत वैद्यकिय (आरोग्य) अधिकारी यांचेकडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी लागेल. स्वतंत्ररित्या कळविणेत येणार नाही. सदर माहिती स्थानिक वर्तमान पत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्द करण्यात येईल.

| अ. क्र. | पदनाम | किमान शैक्षणिक अर्हता | कमाल वयोमर्यादा (दि. 31/07/2019 पावेतो) | पद संख्या (आरक्षणासहित) | एकत्रित मासिक मानधन |
|---|---|---|---|---|---|
| 1 | स्टाफ नर्स | जी.एन.एम. | 38 वर्षे<br>(सर्वसाधारण खुला गट)<br>43 वर्षे<br>(मागासवर्गप्रवर्ग गट सर्व) | **एकुण पद संख्या -** 75<br>अ.ज.-22,<br>विजा (अ)-4,<br>भ.ज. (ब)-2,<br>भ.ज. (क)-3,<br>भ.ज. (ड)-1,<br>विमाप्र-2,<br>इमाव-6,<br>एसइबीसी-11,<br>इडब्ल्यूएस-7,<br>खुला-17 | 12000 |
| 2 | अे.एन.एम. | अे.एन.एम. | 38 वर्षे<br>(सर्वसाधारण खुला गट)<br>43 वर्षे<br>(मागासवर्गप्रवर्ग गट सर्व) | **एकुण पद संख्या -** 10<br>अ.ज.-1,<br>विजा (अ)-1,<br>भज (ड)-1,<br>विमाप्र-1,<br>एसइबीसी-1,<br>इडब्ल्यूएस-1,<br>अराखीव/खुला -4 | 8640 |
| 3 | मिश्रक | डि.फार्मसी | 38 वर्षे<br>(सर्वसाधारण खुला गट)<br>43 वर्षे<br>(मागासवर्गप्रवर्ग गट सर्व) | **एकुण पद संख्या -** 3<br>अजा-1,<br>भज (क)-1,<br>एसइबीसी-1 | 10000 |

| अ. क्र. | पदनाम | किमान शैक्षणिक अर्हता | कमाल वयोमर्यादा (दि. 31/07/2019 पावेतो) | पद संख्या (आरक्षणासहित) | एकत्रित मासिक मानधन |
|---|---|---|---|---|---|
| 4 | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | बी.एस्सी. (मायक्रोबायोलॉजी/ बायोकेमिस्ट्री) डी.एम.एल.टी. (शासनमान्य) | 38 वर्ष (सर्वसाधारण खुला गट) 43 वर्ष (मागासवर्गप्रवर्ग गट सर्व) | **एकुण पद संख्या - 4** अजा-1, अज-1, भज (क)-1, एसईबीसी-1 | 8400 |

**अटी व शर्ती** :-

निवड प्रक्रियेकरिता एकुण 100 गुण असतील व त्याची विभागणी खालीलप्रमाणे असेल.

| अ. क्र. | तपशिल | गुण |
|---|---|---|
| 1. | स्टाफ नर्स, अे.एन.एम., मिश्रक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांच्या शेवटच्या वर्षाच्या गुणानुसार | 80 गुण |
| 2. | 2 वर्षापेक्षा कमी अनुभव असल्यास 0 गुण, 2 वर्ष अनुभव असल्यास 3 गुण, व पुढील प्रत्येक वर्षासाठी 1 गुण याप्रमाणे जास्तीत जास्त 5 गुण राहतील. अनुभवाच्या बाबतीत फक्त शासकिय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणारा अनुभव ग्राहय धरावा. | कमाल 5 गुण |
| 3. | अतिरिक्त शैक्षणिक अर्हता | कमाल 5 गुण |
| 4. | मुलाखत गुण | 10 गुण |
| | **एकुण गुण** | **100 गुण** |

1) स्टाफ नर्स व अे.एन.एम. पदांकरीता महाराष्ट्र नर्सिंग काऊंन्सिलचे नोंदणी व नुतनीकरण आवश्यक आहे.
2) मिश्रक पदांकरीता महाराष्ट्र फार्मसी काऊंन्सिलचे नोंदणी व नुतनीकरण आवश्यक आहे.
3) प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदाकरीता किमान पात्रता बी.एस्सी. (मायक्रोबायोलॉजी/ बायोकेमिस्ट्री) डी.एम.एल.टी. शासनाची मान्यता असलेल्या संस्थेचा शासन मान्य कोर्स आवश्यक आहे.
4) सार्वजनिक आरोग्य विभाग मनपा, नाशिक अंतर्गत भरण्यात येणाऱ्या सर्व पदांची निवड वरील पात्रता गुणांनंतर मुलाखत पदधतीने करण्यात येईल.
5) नाशिक महानगरपालिकेमध्ये नियमित आस्थापनेवर कायम करणेचा हक्क राहणार नाही.
6) सदरील पदे ही निव्वळ मानधनावर भरावयाचे आहेत. सुरूवातीस निवड झालेल्या उमेदवारांना 6 महिन्यासाठी किंवा नियमित आस्थापनेवर पदे भरे पर्यंत जे अगोदर घडेल त्या कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरूपात कामाचे आदेश दिले जातील.
7) अनुभवाच्या बाबतीत स्टाफ नर्स, अे.एन.एम., मिश्रक, प्रयोगशाळातंत्रज्ञ या पदांचा फक्त शासकिय, निमशासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणारा अनुभव ग्राहय धरला जाईल.
8) मुलाखतीस पात्र उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रे व सर्व प्रमाणपत्रांची साक्षांकित सत्यप्रतींसह मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे.
   - पासपोर्ट साईज फोटो-2, जन्म तारखे करिता (वयाचा दाखला/10 वी चे टी.सी/जन्म प्रमाणपत्र), फोटो आयडी मतदान ओळखपत्र/आधारकार्ड इ. शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र, शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका, रजिस्ट्रेशन व नुतनीकरण प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, मुलाखतीच्या अनुषंगाने इतर कागदपत्रे मूळ व सत्यप्रत साक्षांकित प्रत
9) अर्ज छाननी अंती पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची एकास पाच याप्रमाणे यादी प्रसिध्द करून मुलाखत घेण्यात येईल.
10) वर नमुद करणेत आलेली शैक्षणिक अर्हता प्राप्त उमेदवारांनाच प्राधान्य देणेत येईल.
11) उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा राजकीय दबाव आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.
12) नियुक्तीबाबतचा अंतिम अधिकार आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी राखुन ठेवला आहे.
13) मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र व जात प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल. तसेच नव्याने शासनाने मान्यता दिलेल्या ई.डब्ल्यु.एस. व एस.ई.बी.सी. उमेदवारांनी जात प्रमाणपत्र मिळवणेकामी सादर केलेल्या अर्जाची पोहच पावती अर्जासोबत ग्राहय धरण्यात येईल. परंतु जात प्रमाणपत्र प्राप्त होताच त्वरीत सादर करणे आवश्यक राहिल.
14) अर्जदार हा संबधित पदासाठी शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरूदध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.
15) जाहिराती मधील रिक्त पदांच्या मानधन संख्येत बदल करणे तसेच भरती प्रक्रिया कोणत्याही स्तरावर स्थगित करणे, रद्द करणे, प्रक्रियेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त, नाशिक महानगरपालिका नाशिक यांनी राखुन ठेवले आहे.
16) अर्जदाराला मानधन कालावधीत सोयीनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

Sd/-

**आयुक्त,**

**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

# अर्जाचा नमुना

................................................................... या पदासाठी अर्ज

| पासपोर्ट आकाराचा उमेदवाराचा नजिकचा सांक्षाकित फोटो |
|---|

प्रति,
मा. आयुक्त सो.,
नाशिक महानगरपालिका, नाशिक

1. संपुर्ण नाव मराठी इंग्रजी (कॅपीटल लेटर)

- आडनाव :- .................................................. ..................................................
- स्वत:चे नाव :- .................................................. ..................................................
- वडीलांचे नाव / पतीचे नाव :- .................................................. ..................................................
- आईचे नाव :- .................................................. ..................................................

2. पत्र व्यवहाराचा संपुर्ण पत्ता :- ....................................................................................................
   .................................................. पिन कोड सह ..................................................

3. दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक .................................................. ई-मेल आय.डी. ..................................................
4. जन्मतारीख :- दि. /08/2019 रोजीचे वय :- .................. वर्ष :- .................. दिवस :- ..................
5. कोणत्या प्रवर्गासाठी अर्ज केलेला आहे त्याचप्रमाणे चौकटीमध्ये ☐ अशी खुण करावी.

| अनु. जाती | अनु. जमाती | विभुक्त जाती (अ) | भटक्या जाती (ब) | भटक्या जमाती (क) | भटक्या जमाती (ड) | विशेष मागा. प्रवर्ग | इतर मागा. वर्ग | एस.ई.बी. सी | आर्थिक मागास वर्ग | खुला (सर्वसाधारण) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **SC** | **ST** | **VJ-A** | **NT-B** | **NT-C** | **NT-D** | **SBC** | **OBC** | **SEBC** | **EWS** | **Open** |
| | | | | | | | | | | |

6. शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परिक्षा | विद्यापीठ/मंडळाचे नाव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | शेवटच्या वर्षाचे गुण | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | एकुण गुण | प्राप्त गुण |
| 1. | | | | | |
| 2. | | | | | |
| 3. | | | | | |
| 4. | | | | | |

7. अनुभव

| संस्थेचे नाव व पत्ता शासकिय / निमशासकिय/ स्थानिक स्वराज्य संस्था | कालावधी | | एकुण वर्ष / महिने |
|---|---|---|---|
| | पासुन - तारीख/महिना/वर्ष | पर्यंत - तारीख/महिना/वर्ष | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

8. आपणाविरुध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालु आहे काय? असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा.
   ....................................................................................................................................
9. अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.
   1) ज्या पदासाठी अर्ज दाखल केला आहे त्यापदाच्या शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका / प्रमाणपत्र.
   2) स्टाफ नर्स, अे.एन.एम. पदाकरीता महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सीलचे नोंदणी व नुतणीकरण.
   3) मिश्रक पदासाठी महाराष्ट्र फॉर्मसी कॉन्सीलचे नोंदणी व नुतणीकरण.
   4) प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदासाठी किमान BSC (मायक्रोबायोलॉजी/बायोकेमिस्ट्री) DMLT शासनाची मान्यता असलेले संस्थेचा शासनमान्य कोर्सचे कागदपत्र.
   5) शासकिय / निमशासकिय व स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील मुळ अनुभवाचे प्रमाणपत्र.
   6) शाळा / कॉलेज सोडल्याचा दाखला / जन्म दाखला
   7) ओळखपत्र पुरावा (आधार कार्ड / पॅन कार्ड)
10. अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय ? होय / नाही.

मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेत येईल माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

स्वाक्षरी /-
नाव :- ..................................................